महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

विषय:- फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत...

## !! प्रकटन !!

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळांचे प्राचार्य, शिक्षक विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेत स्थळावर शुक्रवार दिनांक १०/०१/२०२५ रोजी Admit Card या link व्दारे download करण्याकरीता उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

या संदर्भात कळविण्यात येते की,

१) मंडळाने उपरोक्त प्रमाणे उपलब्ध करून दिलेल्या प्रवेशपत्रांवर (Hall Ticket) जातीचा प्रवर्ग (Caste Category) या कॉलमची छपाई करण्यात आलेली होती. याबाबत लोकभावनेचा आदर करून मंडळ दिलगिरी व्यक्त करीत आहे. प्रवेशपत्रांवरील **(Hall Ticket)** सदरचा जातीचा प्रवर्ग **(Caste Category)** कॉलम रद्द करण्यात येत असून विद्यार्थ्यांची परीक्षेविषयक इतर माहिती आहे तशीच राहील याची नोंद घ्यावी. सदरची नव्याने तयार केलेली प्रवेशपत्र (Hall Ticket) गुरूवार दिनांक २३/०१/२०२५ पासून Admit Card या link व्दारे download करण्याकरीता उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

२) तसेच माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावरील (Hall Ticket) जातीचा प्रवर्ग (Caste Category) हा कॉलम रद्द करण्यात येत असून सदरची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेत स्थळावर सोमवार दिनांक २०/०१/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजलेपासून Admit Card या link व्दारे download करण्याकरीता उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

तसेच download संदर्भातील उर्वरित इतर सूचना व विद्यार्थ्यांची परीक्षाविषयक माहिती आहे तशीच कायम राहील. यात कोणताही बदल होणार नाही याची सर्व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांनी उपरोक्त बाबींची नोंद घ्यावी.

स्थळ- पुणे.
दिनांक-१८/०१/२०२५

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-०४.

प्रति,

क.पु.वि.मं/माध्य 'क' व उच्च माध्य 'अ'/451
दिनांक:- 20/01/2025

मुख्यध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालये
जिल्हा - पुणे, अहिल्यानगर, व सोलापूर.

उपरोक्त राज्यमंडळाच्या प्रकटनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी सदर माहिती सर्व शाळा व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर प्रवेशपत्रातील दुरूस्त्यांबाबत उपरोक्त पध्दतीने कार्यवाही करण्यात यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे